**महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना व**
**प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत**
***कंत्राटी पद भरती करण्याबाबत***

महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत कंत्राटी मेडीलक को-ऑर्डीनेटर रिक्त पदाची भरती करण्याकरिता इच्छूक उमेवारांनी कडून अर्ज मागविण्यात येत आहे आपले अर्ज जाहिराती प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ते दिनांक ०२/०६/२०२१ पर्यंत **जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, पोस्टल ग्राऊंड जवळ यवतमाळ** येथे कार्यालयीन वेळेत सोबत जोडण्यात आलेल्या अर्ज नमुन्यामध्ये पोस्टाद्वारे किंवा व्यक्तीशः अर्ज सादर यावे. तसेच उशीरा प्राप्त झालेले (प्रत्यक्ष/पोस्टा द्वारे) अर्जाचा विचार केल्या जाणार नाही.

| पदनाम | रिक्त पद संख्या | शैक्षणीक अर्हता |
|---|---|---|
| वैद्यकिय समन्वयक | ७ | (BAMS / BUMS/ BHMS /DENTIST) कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील. MSCIT प्रमाणपत्र |

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती ही पुर्नता कंत्राटी स्वरुपाची असुन निवड झालेल्या उमेदवरास दिनांक.३१/०३/२०२२ पर्यंत नेमणुक दिली जाईल. तसेच महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत सन २०२२-२३ या वरिल पदास मान्यता मिळाल्यास पुढील ११ महिन्यासाठी नियुक्ती देण्यात येईल.

२) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसीक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखला झालेला नसावा.

३) वरिल तक्यातील सर्व पदाकरीता निवड प्रक्रीया ही प्राप्त अर्जाचे संख्येनुसार अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार एका जागेसाठी पाच या पध्दतीचा अवलंब करुन कौशल्य चाचणी व तोंडी मुलाखत घेऊन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. तसेच पात्र व अपात्र उमेदवारांची यादी व इतर माहिती www.yavatmal.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

४) अर्जदाराने अर्ज A4 आकाराच्या कोऱ्या कागदावर करावयाचा असुन त्यामध्ये खालील बाबी अंतर्गत असाव्या

१. अर्जामध्ये ठळक अक्षरात स्वतःचे नाव, पदाचे नाव, कायमस्वरुपी राहत असलेला पत्ता, दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, शैक्षणीक अर्हतेचे सर्व तपशील-अभ्यासक्रमाचे नाव, संस्था विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण झालेले वर्ष, गुणांची टक्केवारी, कामाचा अनुभव, - काम केलेल्या शासकीय / निमशासकीय संस्था/रुग्णलयाचे नाव, ज्या पदावर काम केलेले आहे त्या पदाचे नाव, कालावधी, पदाची जबाबदारी व मानधन/वितन तसेच इतर सर्व माहिती नमुद करावी.

२. अर्जासोबत सत्यप्रतीमध्ये असलेले एस.एस.सी, एच.एस.सी गुणपत्रीका व प्रमाणपत्र शाळेचा दाखला, पदवी गुणपत्रीका (संपुर्ण वर्षाचे) व प्रमाणपत्र, पदव्युत्तर पदवी गणुपत्रीका व प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र / जात वैद्यता प्रमाणपत्र , पासपोर्ट आकाराचे १ फोटो अर्जा सोबत जोडण्यात यावे.

३. उमेदवारानी अर्जासोबत सर्व सत्यप्रती जोडून **जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, यवतमाळ** या कार्यालयाच्या ठिकाणी मा.अध्यक्ष, निवड समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे नावाने सादर करावा.

४. उमेदवारानी वेग वेगळया पदा करिता स्वत्रंत अर्ज करावे रागेल.

५) शासकीय/निमशासकीय संस्थेमध्ये कामकाज केल्याचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

६) जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील.

७) सदर रिक्त पदांच्या संख्येत ठिकाणी बदल होऊ शकतो.

८) सदर पदे करार पध्दतीने भरावयाचे असल्याने एकत्रित मानधना शिवाय अन्य कोणताही भत्ता लागु राहणार नाही. तसेच लेखी परिक्षा / मुलाखतीकरीता येणाऱ्या उमेदवारास दैनिक व प्रवास भत्ता व इतर कोणताही भत्ता कार्यालया कडून मिळणार नाही.

९) जाहिरात प्रसिध्द झाल्या पासून सर्व प्रमाणपत्र वैद्य असणे आवश्यक आहे.

१०) भरती प्रक्रिया स्थगीती देणे/ रदद करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे अधिकार मा.जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

११) उपरोक्त संबंधीत पदाकरिता तत्सम कॉन्सीलकडून रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.

१२) संपुर्ण निवडप्रकिया ही गुणवत्तेवर आधारीत पारदर्शी पध्दतीने घेण्यात येईल.

१३) सदर पदाची वेतनाची रक्कम मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीकडून निश्चित करुन मुलाखतीच्या वेळेस मानधन निश्चित करुन देण्यात येईल.

जिल्हा शल्य चिकित्सक
सामान्य रुग्णालय, यवतमाळ

**माहात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत कंत्राटी पद भरती**

**<u>अर्जाचा नमुना</u>**

**प्रति,**
**मा.जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय यवतमाळ**

पदाचे नाव :- ..........................................................................................

१) उमेदवराचे नाव :- ..........................................................................................

२) उमेदवारांच्या वडिलाचे संपुर्ण नाव :- .........................................................................

३) जन्म तारीख :- ( / / ) वय :- वर्ष ........महिना.........दिवस...........
(जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिवशी)

४) राहण्याचा पत्ता :- ..........................................................................................
..........................................................................................
.........................................पिन कोड.........................

५) मोबाईल नंबर (अनिवार्य) .........................................

६) अर्जदार विवाहीत आहे किंवा नाही :- आहे / नाही

७) शैक्षणीक पात्रता :-

| धारण केलेली अर्हतेचा तपशील | बोर्डाचे / विद्यापीठाचे नाव | एकुण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८) अनुभव :-

| अ.क्र | काम केलेल्या कार्यालयाचे नाव | धारण केलेले पद | कालवधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | दिवस |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

९) अर्जासोबत खालील साक्षांकित प्रति जोडल्या आहेत (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

१) .................. २) ...................... ३) ................ ४) .................

५) .................. ६) ...................... ७) ................ ८) .................

१०) वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. या पदासाठी............... विहित केलेली शैक्षणीक मी धारण करीत आहे. याची खात्री करुन हा अर्ज मी करीता आहे. मी असेही प्रमाणीत करतो / करते की वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कार्यवाहीस मी पात्र बांधीत राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असुन त्या मला मान्य आहेत.

दिनांक :-                                                            स्वाक्षरी